प्रभात २ पुणे, शनिवार दि. १० मे २००८

# शालेय जीवनापासून व्यसनाबाबतची शास्त्रोक्त माहिती द्यावी - विजय नवले

मांजरी, दि.९ (प्रतिनिधी)- "कर्तृत्व सिद्ध करण्याच्या काळातच अनेक तरुण व्यसनांच्या आहारी जात असल्याने, त्याचा परिणाम पुढील संपूर्ण आयुष्यावर होत असतो. त्यासाठी व्यसनांबाबतची शास्त्रोक्त माहिती शालेय जीवनापासूनच व्यापक प्रमाणात देणे गरजेचे आहे," असे मत करिअर मार्गदर्शक प्रा.विजय नवले यांनी दिली.

शेवाळेवाडी येथे तंटामुक्त गाव अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या मोहिमेत आयोजित करण्यात आलेल्या 'व्यसनमुक्ती व आरोग्य' या विषयावर गावातील तरुणांना मार्गदर्शन करताना प्रा. विजय नवले बोलत होते. ॲड. रमेश शेवाळे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी माजी सरपंच पंढरीनाथ शेवाळे, माजी उपसरपंच संदीप शेवाळे, सन्मित्र बँकेचे संचालक संजय शेवाळे आदी उपस्थित होते.

गावातील 'व्यक्ती' आणि 'समाजात' होणाऱ्या तंटयाच्या कारणांपैकी 'व्यसनाधीनता' हे एक प्रमुख कारण आहे; असे सांगून प्रा. नवले म्हणाले, "घरातील सदस्यांपासून गावगाड्यांपर्यंत व्यसनाधीनतेविरोधी चळवळ राबविली गेली पाहिजे. सध्या शहरांजवळील गावात मोठ्या प्रमाणात श्रीमंती नांदू लागली असून, या श्रीमंतीचे प्रदर्शन वेडेवाकडे छंद आणि व्यसनांच्या माध्यमातून होत आहे. कष्टातून आलेल्या संपत्तीच्या तुलनेत जमीन विक्री किंवा इतर मार्गाने आलेली संपत्ती व्यसनात वाहून जात आहे. त्याचा परिणाम ग्राम संस्कृती आणि परंपरेवर मोठ्या प्रमाणात होत असलेला दिसतो.

तरुणांना कुटुंबांकडून मिळणारे 'मुक्त स्वातंत्र्य' हा धोका वाढवित आहे. गावातील प्रतिष्ठित आणि जाणकारांची जरब ढासळत चालली आहे. त्यामुळे पूर्वी पहावयास मिळणारी आदरयुक्त भीती तरुणांमध्ये दिसत नाही. सोळा ते अठरा वयोगटांपासून कर्तृत्वाचा काळ सुरू होतो. मात्र, याच कालावधीत मोठ्या प्रमाणातील तरुणवर्ग व्यसनांच्या आहारी जाताना दिसतो. या गोष्टीला आळा घालून सुसंस्कृत ग्रामजीवन आणायचे असेल तर व्यसनाधीनता रोखायला हवी, असेही प्रा.नवले यांनी सांगितले. संजय शेवाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

११ मे २००८ पुढारी

# 'अपयशावर खंबीरपणे मात करण्याची गरज'

मांजरी (प्रतिनिधी) : स्वत:च्या जगण्यावर विश्वास नसल्यानेच तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जाऊन संपत आहे. याला रोखण्यासाठी अपयशावर मात करून खंबीरपणे उभे राहण्याची खरी गरज आहे, असे मत प्रा. विजय नवले यांनी व्यक्त केले.

शेवाळेवाडी येथे तंटामुक्त गांव अभियानांतर्गत येत असलेल्या मोहिमेत आयोजित करण्यात आलेल्या 'व्यसन मुक्ती व आरोग्य' या विषयांवर मार्गदर्शन करताना प्रा. नवले बोलत होते. यावेळी ॲड. रमेश शेवाळे, संजय शेवाळे, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. नवले म्हणाले की, व्यसन ही वादविवादातून लागले जाते. त्यासाठी एखादी बाजू मांडताना अभ्यासू पद्धतीने मांडावी. नैराश्यातून तरुणांना व्यसन जडते. यासाठी आपलाच आपल्यावर चांगला विश्वास असल्यास कसलेही व्यसन लागणार नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांनी बौध्दिक व मैदानी खेळ याकडे लक्ष देण्याची गरज आहे.